डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस<br>सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८ /२०२५ दि. ०१/०२/२०२५

—: **वाहतूक नियंत्रण अधिसूचना** :—

**ज्याअर्थी, डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. ०२/०२/२०२५ रोजी ते दि. ०४/०२/२०२५ रोजी संध्याकाळी १८:०० ते रात्रौ २२:०० वा. पावेतो गणेश मंदिर संस्थान, डोंबिवली पूर्व तर्फे माघी गणेशोत्सव निमित्ताने **" श्री गणपती अथर्वशीर्ष अतरंग"** व्याख्यान कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमाचे ठिकाणी अनेक नागरीक व विविध मान्यवर उपस्थित राहणार असुन सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त**, वाहतूक विभाग, **ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद—** कल्याण डोंबिवली महानगर पालीकेच्या ठाकुर्ली जोशी हायस्कुल समोरील रोडने आप्पा दातार चौक मार्गे फडके रोडकडे येणाऱ्या वाहनांना **गणपती मंदिर गेट जवळ, नेहरु रोड** येथे व छेडा रोड कडुन आप्पा दातार चौक मार्गे फडके रोडकडे येणाऱ्या वाहनांना सर्व प्रकारच्या वाहनांना **आप्पा दातार चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग—** सदरची वाहने ठाकुर्ली जोशी हायस्कुल समोरील रोडने आप्पा दातार चौक मार्गे फडके रोडकडे येणारी वाहने सरळ येवुन टिळक रोडने सावरकर रोड अथवा मदन ठाकरे चौक येथुन व छेडा रोड कडुन आप्पा दातार चौक मार्गे गणेश मंदिर कडे येणारी वाहने डावे वळण घेवुन सावरकर रोड अथवा टिळक रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दि. ०२/०२/२०२५ रोजी ते दि. ०४/०२/२०२५ रोजी सायंकाळी १८:०० वा. ते रात्रौ २२:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
परिवहन व्यवस्थापक, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

CamScanner

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

CamScanner